# अग्निरेखा

अनंत तिबिले

रिया पब्लिकेशन्स्

**अग्निरेखा : अनंत तिबिले**

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.


**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**प्रथम आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ४३०/-

माझे मित्र शिक्षणमहर्षी
**पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील**
यांच्या शिक्षण क्षेत्रातील
उत्तुंग कामगिरीबद्दल सविनय

**- अनंत तिबिले**



# 'अग्निरेखा' च्या निमित्ताने...

शिवकालावर आजपर्यंत मी अनेक कादंबऱ्या लिहिल्या.

मी प्रसिद्धि पराङ्मुख असा लेखक आहे. कोणत्याही स्पर्धेत कधीच भाग घेत नाही. एवढंच काय, सुरुवातीची पाच-पंधरा पुस्तकं सोडली, तर मी एकही पुस्तक परीक्षणासाठी पाठवत नाही.

ज्याअर्थी माझ्या कादंबऱ्या पुनर्मुद्रित होतात, आणि वाचकांचीही मला असंख्य पत्रं सातत्याने येत असतात, त्याअर्थी मी लिहावं असंच त्यांना वाटतं हे निश्चित; आणि म्हणूनच मी सातत्याने लिहितो आहे. कुणा समीक्षकाने दखल घेतली नाही तरी लिहीत आहे. आणि जोपर्यंत वाचक मागेल नि प्रकाशक ते प्रसिद्ध करायला तयार असेल, तोवर मी लिहीतच राहणार आहे.

आज माझी 'अग्निरेखा' वाचकांसमोर येत आहे.

महाराणी जिजाबाईंच्या जीवनावरील कादंबरीला अग्निरेखा नाव योग्य आहे की नाही, याचा खल कदाचित होईलही; परंतु सबंध शिवशाही गेली एकवीस-बावीस वर्षं हातात घेऊन बसलेला मी, शिवशाहीतल्या प्रत्येक पात्राचा निस्पृहपणानं अभ्यास केलेला मी, आणि जेवढी उपलब्ध होतील तेवढी सर्व पुस्तकं नि:पक्षपातीपणे डोळ्यांखालून घालणारा मी... महाराणी जिजाबाईला अग्निरेखा या नावाने संबोधणंच उचित समजतो.

मी एक हिंदू माणूस आहे; हिंदुत्वनिष्ठ आहे. जन्मानं माणसाची जात नसून ती त्याच्या आचार-विचार यावरूनच ओळखली जावी या मताचा आहे. या देशातला-मग तो हिंदू, शीख, इसाई, मुस्लीम वा अन्य कोणत्याही जातीचा असेना का- त्याची जात त्याच्या घराच्या उंबरठ्यापर्यंत- बाहेर मात्र तो हिंदूच ! कारण तो या देशात जन्म घेतो, इथलं अन्न खाऊन, पाणी पिऊन नि वायुलहरींचा स्वाद चाखून मोठा होतो. आपल्या कुवतीप्रमाणे याच धर्मावर आपल्या नि आपल्यावर निर्भर असलेल्या कुटुंबियांची भवितव्यं साकार करण्याचा प्रयत्न करतो आणि हा अधिकार केवळ या हिंदुस्थान नावाच्या देशात राहणाऱ्या हिंदूंनाच; अन्य कुणालाही नाही !

स्वातंत्र्योत्तर गेल्या अठ्ठेचाळीस-पन्नास वर्षांत म. गांधींच्यासारख्या नि:स्पृह माणसाचं नेतृत्व संपलं. जे केवळ देशाचाच विचार करणारे विचारवंत होते, ते सत्तास्पर्धेत मागे पडले आणि मग या देशात वरपासून खालीपर्यंत भ्रष्टाचार, दुर्वर्तन, ऐषाराम, बेतालपणा आणि हा

देश जणू आपल्या बापाचा देश नि या देशातल्या साऱ्या सुखसोई, ऐषआराम, सुविधा पिढ्यान्‌पिढ्या जणू आपल्या मालकीच्या, ही भावनाच मुळी दृढ झाली आणि ती सत्ताधाऱ्यांच्या नसानसातून एवढी भिनली की, या देशाचं नेतृत्व करणारा माणूस या देशाचं भलं करण्याऐवजी आपल्या पिढ्यान्‌पिढ्यांचं कोटकल्याण करण्यासाठी जन्माला आला आहे की काय, हीच शंका या देशातल्या प्रत्येक सामान्य नागरिकाला यावी.

राष्ट्राध्यक्षापासून ग्रामपंचायतीच्या सामान्य सदस्यापर्यंत 'आपला देश' ही भावनाच संपली. देशप्रेम पायाखाली तुडवलं गेलं. ज्यांच्या जिवावर आपण सत्ता भोगतो आहोत, त्यांचा विचारही कुणाच्या मस्तकात येईनासा झाला.

साधा पंचायतीचा उमेदवार येतो, समोरच्या माणसाचं वैयक्तिक काम आहे याचा विचारही न करता अवैध मार्गाने मिळविलेल्या पैशातून शे-पाचशे रुपयाचं पुडकं पुढे टाकतो नि ताब्यात देताना बजावतो, 'हे पैसे – पाचशे आहेत. प्रत्येकी पन्नास. तुमच्या घरात दहा माणसं आहेत. ही सारी मतं मला मिळायला हवीत. एखादं जरी मत फुटलं तरी ते मला लगेचच कळेल. मग तसं झालं तर या गावात तुम्हाला जगता येणार नाही. घरातल्या बायकांची अब्रू तर वेशीलाच टांगली जाईल. मग आम्हाला दोष लावायचा नाही.'

पंचायतीला पाचशे रुपये मिळाले, तर नगरपालिकेला हजार रुपये मिळतात. विधानसभेला ती रक्कम पाच हजारावर जाते नि लोकसभेला लोकशाहीची किंमत दहा हजारांवर स्थिरावते. गावापासून शहरापर्यंत लोकशाहीचा जो विचका चालला आहे, तो गेली पन्नास वर्षं मी उघड्या डोळ्यांनी पाहतो आहे आणि मग नाइलाजाने म्हणतो आहे. 'गांधीजी, तुम्ही वेळीच गेलात तेच बरं झालं ! अन्यथा लोकशाहीचं हे हिडीस स्वरूप आपल्याला पाहवलं नसतं. ते पाहण्यापेक्षा तुम्ही आपले डोळे फोडून घेतले असतेत.'

गेली अनेक वर्षं सत्तास्पर्धेत यशस्वी होणाऱ्या चाणाक्ष सत्ताधाऱ्यांनी आपल्या यशाचं गणित मांडून ठेवलं आहे.

शंभर मतदारांतले सर्वसाधारणपणे पस्तीस टक्के सुशिक्षित नि समंजस मतदार मतदानाच्या या सुंदोपसुंदीत भाग घेतच नाहीत. म्हणजे मतदान फार फार तर साठ वा पन्नास टक्के होतं. यातलं तीस ते पस्तीस टक्के मतदान आरक्षणातील शेकडो पक्ष खिरापतीसारखं वाटून घेतात. खरं तर ही सारी मतं एकत्र एखाद्याच पक्षाला मिळाली असती, तर तो पक्ष सत्तेवर नक्कीच आला असता आणि न जाणो, त्यानं लोकहिताची काही कामं केली असती.

पण एकजुटीने दुर्वर्तनाचा विरोध करण्याइतपत आमचे विरोधी पक्ष समंजस असतील तर ना ! उरली तीस पस्तीस टक्के मतं.

ही सत्ताधाऱ्यांच्या हातातली मतं होत.

अल्पसंख्यांकांना अल्पसंख्य म्हणून त्यांना पाच पाच लग्नं नि डझनवारी पोरं काढण्याची परवानगी द्यायची नि त्यांची मतं खिशात घालायची.

मागासवर्गियांना प्रत्येक बाबतीत सवलती द्यायच्या, आम्हीच तुमचे मायबाप म्हणून त्यांची दिशाभूल करायची नि ती एकगठ्ठा मतं आपल्या खिशात घालायची. याशिवाय निरनिराळ्या शैक्षणिक संस्था, सूतगिरण्या, साखर कारखाने, पंचायती, नगरपालिका, जिल्हा परिषदा यांचे पित्तेही व चमचे-त्यांना खाऊ पिऊ मिळाल्यावर त्यांनी विरोध करावाच का?

साहजिकच काहीही झालं तरी हे मतदान पस्तीस टक्क्यांपर्यंत जातेच नि सत्ता हाती येतेच. गेली चाळीस-पन्नास वर्षे लोकशाहीच्या नावावर या देशात हीच नाटकं चालली आहेत नि ती यशस्वीही होत आहेत.

माझं या देशातील कुणाही सूज्ञ, समंजस नि विचारी माणसाला- मग तो हिंदू असो, इसाई असो, शीख असो वा मुस्लीम- आवाहन आहे की, त्याने या देशाचा सर्व्हे करावा. भारत-पाक फाळणीच्या वेळी भारतातल्या मुस्लिमांची संख्या मिळवावी आणि गेल्या अठ्ठेचाळीस-पन्नास वर्षांत त्यांच्यात किती वाढ झालेली आहे ती पाहावी.

माझी खात्री आहे, आज तरी दहा पटीपेक्षाही अधिक वाढ झाली असेल आणि माझी खात्री आहे, हे आणखीन पन्नास वर्षं असंच चालत राहिलं, तर त्या वेळी या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या मुस्लिमांची असेल.

आणि त्या वेळी हे मुस्लीमच या देशाचे शासक बनून हे राष्ट्र हिंदुस्थान न राहता न जाणो, कदाचित पाकिस्तान म्हणवून घेत राहील.

कुणी म्हणेल मी यवनद्वेष्टा आहे; पण हा त्यांचा गैरसमज आहे. पण शिवपूर्वकालाच्या आधीच्या साडेसहाशे वर्षांचा इतिहास पाहिला, स्वातंत्र्योत्तर काळातील अठ्ठेचाळीस-पन्नास वर्षं पाहिली की साहजिकच मनात विचार येतो, 'या माणसांच्यावर विश्वास ठेवावा काय? ह्यांना हिंदू म्हणावे काय ? ही माणसं हिंदुत्वाशी एकनिष्ठ राहतील ? या माणसांना आपलं म्हणणं योग्य होईल ?'

खरं तर भारतावर या माणसांचा तसा काहीएक अधिकार नाही. सुरुवातीच्या काळात बळाच्या जोरावर या सुवर्णनगरीचं वैभव हिरावून नेण्यासाठी आलेली ही दरोडेखोर मंडळी. गझनीच्या महंमदाने त्या हेतूने खऱ्या स्वाऱ्या केल्या. सोमनाथाचं मंदिर उद्‌ध्वस्त करण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या महंमदाला हिंदूंनी अपार संपत्ती देण्याची तयारी दर्शविली होती; पण नेमक्या याच वेळी त्याचा धर्मद्वेष्टेपणा आड आला आणि त्याने मंदिर फोडलं. हिंदूंच्या जणू काळजावरच घाव घातला.

त्यानंतर पैशाबरोबरच त्यांना सत्तेची हाव लागली. साम्राज्यविस्ताराची स्वप्नं पाहू लागले ते नि काही अंशी ते यात यशस्वीही झाले.

बाबर त्याचं चांगलं उदाहरण आहे.

एखाद्यानं सत्ता, संपत्ती नि बळ याच्या जोरावर एखादं राज्य जिंकणं. साम्राज्यविस्तार करणं यात काहीच गैर नाही. फार पूर्वीपासून ही प्रथा आपल्या इतिहासात नोंदविली गेली आहे.

मात्र साम्राज्यविस्तार करीत असताना गावं उद्ध्वस्त नि बेचिराख करणं, तिथल्या जनतेला बाटवणं, शरण आले नाहीत त्यांची अमानुष कत्तल करणं, त्यांच्या आया-बहिणी भ्रष्ट करणं, त्यांना आपल्या बटकी बनविणं, देवळं फोडणं...

हे मात्र साम्राज्यविस्ताराच्या मागे लागलेला उचित नि योग्य नव्हे.

शरण आलेले लोक ही राजाची रयत असते नि या रयतेचं हित पाहणं राजाचं कर्तव्यच असतं. पण साडे सहाशे वर्षांत सुलतान म्हणवून घेणाऱ्या एकाही व्यक्तीनं यवन सोडून अन्यांचं हित कधीच पाहिलं नाही. त्यांना माणसासारखं जगूच दिलं नाही. सर्वधर्मसमानतेची पताका खांद्यावर घेऊन मिरविणाऱ्या अकबरानेही नाही.

चितोडमध्ये शरण आलेल्या वृद्ध, अपंग, लहान मुला-मुलींच्या तीस हजारांच्या जनतेची निर्घृण कत्तल करणं सर्वधर्मसमानतेत बसतं ?

हिंदूंच्या घोड्याच्या पाठीला डागणी देऊन तो हिंदू आहे हे ओळखता येण्याची कायमची खूण करणं सर्वधर्मसमानतेत बसतं? हिंदूने आपल्या खांद्यावरील कपड्यावर दुसऱ्या रंगाच्या कापडाचं ठिगळ लावण्याची सक्ती करणं सर्वधर्मसमानतेचं द्योतक आहे? केवळ स्त्रियांच्यासाठीच असलेल्या बाजारात स्वत:ची हजेरी लावून इतरांच्या बायकांचं सौंदर्य निरखणं सर्वधर्मसमानतेची द्वाही फिरविणाऱ्या अकबराला शोभण्यासारखं होतं? राजपुतांच्या स्त्रियांशी लग्न करणं, मात्र यवन स्त्रियांना राजपुतांशी सोयरीक करू न देणं. ही सर्वधर्मसमानता आहे ?

साडे सहाशे वर्षांच्या कालावधीत यवनांनी एकच केलं.

हिंदू संपवायचा. त्याला बाटवायचा.

त्याचा परिणामच असा झाला की, हिंदू संपत आला.

अल्लाउद्दीन खिलजीनं तर उरलंसुरलं देवगिरीचं यादवांचं विजयनगरच उद्ध्वस्त केलं आणि हे सारं घडलं अनीतीने, स्वैराचाराने, दुर्वर्तनाने, सत्तेच्या बळावर.

पण या देशाचा एक इतिहास आहे, या देशाला एक परंपरा आहे, या देशाची एक संस्कृती आहे आणि या संस्कृतीच्या जिवावरच तर एवढे अनन्वित अत्याचार होऊनही हा देश सुरक्षित आहे, या देशाची संस्कृती सुरक्षित आहे.

चाळीस लाखाच्या चेकच्या प्रकरणात इंदिरा गांधींचं नाव गोवलं गेलं, बिचारा नगरवाला तुरुंगात अचानक मेला नि हे प्रकरण थंडावलं. बोफोर्स प्रकरणात राजीव गांधींना गोवलं गेलं, त्यांची हत्या झाली नि या प्रकरणाचं कुठं काय झालं, हे सामान्य जनतेला कधीच समजलं नाही. हर्षद मेहताने शेअर्स घोटाळे केले. त्याने एक बॅग नरसिंहरावांना दिल्याचं ठामपणे सांगितलं; पण त्यातील रकमेचा आकडा कधीच ऐकता आला नाही. ही ती असली प्रकरणं वरच्या पातळीवर किती नि केवढी असतील याचा थांगपत्ता लावण्यासाठी पाचशे समित्या नेमल्या, तरी त्यातल्या पाचशेही समित्यांनी लाच घेऊन ती सर्व प्रकरणं दाबून टाकली, असंच अखेर आपल्याला ऐकावं लागेल.

गल्लीपासून दिल्लीपर्यंतची आजची अवस्था पाहिली की, कुणाही समंजस, सूज्ञ नागरिकाची मान शरमेने खाली व्हावी.

अठ्ठेचाळीस पन्नास वर्षं लोकशाहीचं छत्र घेऊन मिरवणारा हा देश; या देशात लोकशाही आहे असं म्हणणं म्हणजे लोकशाहीची थट्टा करण्यासारखं आहे.

असंख्य जाती-जमाती असलेल्या या देशात जे समाजाकडून खरंच रंजले गांजले गेले आहेत, त्यांना सोयी- सवलती देणं योग्यच होतं. पण ज्यांनी तब्बल साडेसहाशे सातशे वर्षं या देशावर राज्य केलं, माणुसकीला काळिमा फासला जाईल असं वर्तन केलं; धर्मांध बनून इथल्याच प्रजेला बाटवलं. असंख्य आया-बहिणींची अब्रू लुटली. त्यांना सोयी-सवलती देण्याचा घाट घालणं. तो अमलात आणणं हे कोणत्या लोकशाहीत बसतं ?

यवनांच्या साडेसहाशे सातशे वर्षांत आम्ही फक्त त्यांची दगलबाजी, नमकहरामी, विश्वासघात, नि अमानुष वर्तनच पाहिलं आहे. या धर्मांधांनी येथील रयतेला जनावरापेक्षाही हीन वर्तणूक दिली आहे. ज्यांनी सत्तेसाठी स्वत:च्या सख्ख्या भावांची हत्या केली, बापाला कैदेत टाकलं, स्त्रीला केवळ शरीरसुखाचं साधन बनविलं, संपत्तीसाठी-सत्तेसाठी ज्यांनी निष्पापांची हत्या केली; त्यांच्या नसानसात शेकडो वर्षं भरून राहिलेली दगलबाजी नाहीशी झाली असेल, ती माणसं बनली असतील, निष्ठावंत बनली असतील असा कयास कोणत्या धुरंधर राजकारण्याने काढला ? त्यांना सोयी- सवलती देण्याचा कायदा कुणी केला ? का केला ? नि यातून त्यांनी काय साधलं ?

ज्या यवन सत्तेने आपल्या साडेसहाशे सातशे वर्षांच्या कारकीर्दीत हिंदूंना त्यांच्याच भूमीत कुत्र्यासारखे वागवले, कुवत असूनही त्याला आपल्या सैन्यात कधीच वरची जागा दिली नाही, त्याच्या मर्दुमकीचा उपयोग करून घेऊन आपला राज्यविस्तार नि आपला कार्यभाग आटोपताच त्याची अमानुष हत्या केली, त्यांच्यावर विषप्रयोग केले; त्या स्वैराचारी यवनांना सहानुभूती दाखवण्याचे, सोयी-सवलती देण्याचे या सरकारला कारणच काय ?

आज हेच यवन या देशात मंत्रिपद भूषवित आहेत.

आय. ए. एस. अधिकारी बनून जिल्ह्याचे सर्वेसर्वा बनले आहेत.

गेल्या अठ्ठेचाळीस पन्नास वर्षांत या देशात जी गुन्हेगारी घडली आहे; जो भ्रष्टाचार घडला आहे; खून, दंगली, बलात्कार आदी घटना घडल्या आहेत. त्यातील पंचाहत्तर टक्के घटना या मुस्लिमांच्याकडून घडलेल्या आहेत, हेही या देशातलं एक सत्य आहे.

ज्या ताटात खायचं, त्याच ताटात विष्ठा करायची याची पिढ्यान्‌पिढ्या सवय जडलेल्या या यवनांनी मुंबई नि अन्यत्र जे बॉम्बस्फोट घडविले, ते याचं द्योतकच नव्हे का? काश्मीरमध्ये जो दहशतवाद माजवला आहे, त्यामागेही देशातील नि पाकिस्तानातील मुस्लीमच आहेत हे तर आता सगळ्या जगाला ठाऊक झालेलं आहे.

सत्ताधीश यवनांच्या अत्याचारांचा उल्लेख या ठिकाणी केला, तर तो अनाठायी ठरू नये.

केवळ संपत्ती मिळविण्यासाठी हिंदुस्थानावर सतरा स्वाऱ्या करणाऱ्या महंमद गझनीचे उदाहरण घेऊ.

त्याच्या मते हिंदू काफर होते म्हणून त्यांना नरकाच्या भट्टीत जाळून काढणेच इष्ट. त्याने तसे प्रयत्न केले म्हणूनच हिंदू काश्मीर, बनारसकडे पळून गेले.

सोमनाथाची मूर्ती सुरक्षित राहावी म्हणून विनवणाऱ्या ब्राह्मणांना त्याने सांगितले, 'बुत फरोश (मूर्तीपूजक) अशा कीर्तीपेक्षा बुत्‌शकिन (मूर्ती-विध्वंसक) ही कीर्ती मला मान्य आहे.'

त्यानंतरचा महंमद घोरी म्हणतो, 'या काकमुखी हिंदूंना नरकयातना भोगायला लावू.' गुलाम घराण्यातील कुठल्याही जबाबदार पदावर हिंदूंची नियुक्ती करू नये. शांतता प्रस्थापित करण्याच्या इराद्याने त्याने दिल्लीच्या आसपास एक लाख हिंदूंची अमानुष कत्तल केली. बंगालमध्ये अनेक वधस्तंभ उभे करून हिंदूंना त्यावर सुळी दिले. त्याने हिंदूंच्या रक्ताच्या नद्या वाहविल्या. मांसाचे प्रचंड ढीग उभे केले. सगळीकडे दुर्गंधी पसरवली. खिलजीचे हिंदूबद्दलचे मत - हिंदूने कर द्यावेत. यवन अधिकाऱ्याने चांदी मागितली, तर हिंदूने त्याला सोने द्यावे. अधिकारी जर त्याच्या तोंडावर थुंकला तर ती थुंकी झेलण्यासाठी हिंदूने तोंडाचा 'आ' पसरला पाहिजे. हजरत पैगंबराची आपणास आज्ञा आहे की, हिंदूंचा अपमान करा, त्याचा वध करा, त्याला लुटा, त्याला बंदी करा.

अल्लाउद्दीन खिलजी- हिंदूंनी घोड्यावर बसू नये. हत्यार बाळगू नये. मौल्यवान पोषाख घालू नये. आपल्या जमिनीतील अर्धे उत्पन्न पातशाहीत भरावे. गाई-म्हशीवरही कर द्यावा. यवनांच्या घरी चाकरी करावी. एखाद्या हिंदूने लग्न केलेच, तर त्याच्या बायकोने यवन अधिकाऱ्याची सेवा करावी-आता ही 'सेवा' म्हणजे नेमके काय, हे सूज्ञ वाचकांना मी सांगणे न लगे.

दिल्लीचा एक ब्राह्मण आपल्या घरी मूर्तीची पूजा करायचा. मूर्ती नवसाला पावते अशी प्रसिद्धी झाली. त्याच्या घरी हिंदू नि मुसलमानही गर्दी करू लागले. हे फिरोझखानाला समजले. त्याने त्याला पकडले. त्याचे हात-पाय बांधले. लाकडाच्या ढिगावर त्या मूर्तीसह ठेवले नि त्याला आग लावली. तो ब्राह्मण मूर्तीसह अग्नीच्या स्वाहा झाला.

फिरोझखान आपल्या डायरीत म्हणतो.

'हिंदूंना ठार मारण्याची आज्ञा मी केली. त्यांच्या मूर्ती फोडणे, देवळे पाडणे नि त्या जागी मशिदी बांधण्याचा पायंडा मीच सुरू केला. प्रजेला इस्लाम स्वीकारण्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब केला. त्यामुळेच घाबरून असंख्य हिंदू बाटले.'

तैमूरलंग- भारतात शिरताच त्याने हजारो हिंदूंची कत्तल केली. लक्षावधी हिंदूंना कैद केले. त्यांनी बंड करू नये म्हणून १५ वर्षांखालील मुलांची अमानुष हत्या केली. सतत पाच दिवस त्याने दिल्ली मानवी रक्ताने धुऊन काढली. प्रेतांच्या प्रचंड राशीच्या राशी उभ्या केल्या. जाताना तो म्हणालाही, 'दोन गोष्टींसाठी मी इथं आलो होतो. एक म्हणजे; काफरांना लुटून परलोक-साधन करावे व दुसरे, त्यांची संपत्ती लुटून इहलोक साधावा.'

बाबर- हिंदू कैद्यांचा अमानुष संहार, हिंदू स्त्रिया नि मुलांची विक्री केली. सुंदर, तरुण स्त्रियांना यवनांच्या उपभोगार्थ वाटून टाकल्या. त्याने गुरू नानकांनाही कैद करण्यास नि त्यांचे हालहाल करण्यास मागे पुढे पाहिले नाही.

अकबराबद्दलचा उल्लेख वर आलेलाच आहे.

सलीम ऊर्फ जहांगीर याने हिंदूंच्या हत्येसाठी हत्ती नि हिंस्र कुत्री यांचा वापर केला. त्यांच्या तावडीतून जे जगतील-जखमी होतील, त्यांना नदीत फेकून देण्यात येई किंवा त्यांची मस्तकं उडवून त्यांना नग्नावस्थेत रस्त्यातच फेकून दिले जाई.

साडेसहाशे-सातशे वर्षं परकीय मुलखात तख्तशीन होऊन तेथील हिंदू रयतेचे यवनांनी केलेले हाल, छळ, दिलेल्या यातना या सर्व पाहता ही माणसं नव्हतीच मुळी; तर ती हैवान होती, सैतान होती असं म्हणणंच अधिक संयुक्तिक होईल.

वास्तविक भारत-पाक निर्माण झाल्यानंतर याच सत्तांधांच्या अनुयायांनी पाकिस्तानात चालते होणे हेच इष्ट होते आणि येथील सरकारनेही त्यांना या देशाबाहेर हाकलणे योग्य होते. कारण सापाला दूध पाजलं तरी तो विष ओकणार, काटा पायात रूतणारच- हा त्यांचा स्थायिभावच होता.

पण अकबरासारखीच सर्वधर्मसमभावाची नकली पताका खांद्यावर घेऊन जातीय राजकारण करून सत्तास्पर्धेत नेहमीच यशस्वी होणाऱ्या या देशाच्या भोंदू सत्ताधीशांना देव, धर्म, देशाचं मोलच कुठे होते ? त्यांना केवळ सत्ता हवी होती आणि ही सत्ता मिळवायला, प्रत्यक्ष देश गहाण टाकायला वा त्याचं पाकिस्तानीकरण करायलाही यांची तयारी होती नि आजही आहे.

हजारो मंदिरं उद्ध्वस्त करणाऱ्या, असंख्य देवदेवतांच्या मूर्ती जाळणाऱ्या आणि लाखो लोकांना हिंस्रपणानं बाटविणाऱ्या यवनांच्या एका मसजिदीला धक्का लागला तर इथल्या सरकारनं केवढं आकांड तांडव केलं नि सरकार पाठीशी आहे याची खात्री होताच हिंदूंचेच तुकडे चघळून मुजोर बनलेल्या यवनांनी या देशात असंख्य बॉम्बस्फोट घडवून, असंख्य निष्पाप जिवांची निर्घृण हत्या केली. अब्जावधी रुपयांच्या संपत्तीची राखरांगोळी झाली. असंख्य विध्वंसक हत्यारं राजरोसपणे देशात आणली गेली. हे सर्व पाहता हे घडवून आणणाऱ्यांच्या मस्तकावर शासकीय वरदहस्त असल्याशिवाय हे होणे नाही, हे कुणीही आंधळा माणूस सांगेल.

'हजरतबाल' प्रकरण तर शासनानं आपल्या अस्मितेचं, प्रतिष्ठेचं प्रकरण बनवलं होतं. याउलट गेल्या कित्येक वर्षांत काश्मीरमधल्या हिंदू जनतेच्या आयुष्याची जी फरफट चालली आहे, पाक अतिरेक्यांकडून ज्या निष्पाप जिवांचा संहार चालला आहे, त्याचं मोल मात्र स्वत:ला जनताप्रिय म्हणवून घेणाऱ्या सरकारला मुळीच नाही. परकीय 'बाल' प्रिय आहे; हजारो स्वकीयांचे जीव नाहीत.

एक्क्याण्णव ते चौऱ्याण्णव या चार वर्षांतल्या राष्ट्रीय सरकारच्या कर्तृत्वाचा टीव्ही, आकाशवाणी, जाहिराती आदींद्वारे खूपच बोलबाला झाला आहे. बोलबाला म्हणण्यापेक्षा हे सरकार स्वत:च स्वत:च्या मुखाने स्वत:चं वारेमाप कौतुक करू लागलं आहे.

पण याच काळात बॉम्बस्फोट घडले.

या चार वर्षांतल्या गुन्हेगारी, भ्रष्टाचार, स्वैराचार, भाववाढ आदीचे प्रमाण पाहिले, ते गेल्या चाळीस-चव्वेचाळीस वर्षांपेक्षा अधिकच भरेल यात कुणाला संदेह असण्याचं कारण नाही आणि तरीही या चार वर्षांचा शासकीय यंत्रणेतून उदो उदो होतोच आहे. तुणतुणी वाजवली जात आहेत. डफ बडवले जात आहेत. इतके की, सर्वसामान्य माणूसही 'ते' डोळ्यांसमोर नको म्हणून डोळे झाकून घेऊ लागला आहे.

यावनी सत्तेच्या अखेरच्या काळासारखीच आज देशाची स्थिती आहे.

त्या वेळी शेवटची घरघर लागलेली यावनी सत्ता सत्तेवर होती.

आज अल्पसंख्यांक म्हणून यवनांना पाठीशी घालून त्यांना सोयी- सवलतींची खिरापत वाटून त्यांच्या दृष्ट कृत्यांवर पांघरूण घालून त्यांची संख्या वाढविणारं यवनधार्जिणं सरकार अस्तित्वात आहे. त्या काळी शासक यवन नि गुन्हेगार यवन म्हणून स्वकीय 'रामशास्त्री' त्यांना निर्दोषी म्हणून जाहीर करीत; आज शासक यवनधार्जिणे नि अपराधी यवन; त्यांची एकगठ्ठा मते आपल्याला मिळून आपली सत्ता आपल्याच हातात ठेवण्यासाठी चौकशी समिती, स्वतंत्र न्यायालयाची स्थापना आदींच्या घोषणा करून गुन्हेगारांच्या चौकशीचा फार्स सुरू आहे. कोट्यावधी रुपयांचा चरस, एल.एस.डी., ब्राऊन शुगर यांसारखे अमली पदार्थ राजरोसपणे या देशात आणून या देशातील हिंदू युवकांना षंढ बनविण्याचं कुटिल कारस्थान चालू आहे; आणि तेही सरकारी यंत्रणेच्या आशीर्वादाने.

साक्षरता प्रसारात नियोजन, बेकारी हटविण्याची घोषणा, गरिबी नष्ट करण्याचं आश्वासन, स्त्रीला समान दर्जा देण्याच्या घोषणा, कामगार-शेतकऱ्यांच्या कल्याणार्थ पवित्रे ही सारी शुद्ध फसवणूक आहे. शाळेचं आकर्षण वाढावं म्हणून विद्यार्थ्यांना एक वेळचा आहार देण्याचा उपक्रम हा यापूर्वीच्या अंडी नि दूध प्रकरणासारखा फसवा नि फसवणाराच ठरणार आहे. त्यातून नव्या पिढीला काही लाभ होण्याची शक्यता नाहीच नाही.

अग्निरेखेच्या प्रस्तावनेत हे सारं लिहिण्याचं कारण-

साडेतीनशे वर्षांपूर्वीची सामाजिक स्थिती आणि आजची स्थिती यात तसा फारसा फरकच नाही. तत्कालीन संत कवी श्रीसमर्थ रामदासांनी वर्णिल्याप्रमाणे-

येक देव दुराचारी। फोडिला बळे।।
येक देव जापाणिला। येक देव उदकी टाकिला।।
येक देव नेऊन द्यावला। पायादळी।।

ते पुढे लिहितात,

किती गुज्रिणी ब्राह्मणी भ्रष्टविल्या
किती शामुंखी जाहजी फांकविल्या
किती येक देशांतरी त्या विकोल्या
किती सुंदरा हाल होऊन मेल्या

आणखीन ते म्हणतात-

तव तो गल्बला जाला, परचक्र आले
अकस्मात धाडी आली, कांता बंदी करून नेली
वस्तभाव ही गेली, प्राणीयाची
तेणे दु:ख झाले भारी, दीर्घ खरे सदन करी
मनी आळवे सुंदरी, गुणवंत।
तव तिची वार्ता आली, तुमची कांत भ्रष्टविली

श्री गुरुचरित्रकार सरस्वती गंगाधर यांनी एका यवनाचे आसवृत्त कथन केले आहे-

पूर्वज की पंचविसी। होतो राजा यवन देशी
दुर्जय नाव आपणासी। दुराचारी वर्तलो जाठा
म्या मारिले बहुत लोक । प्रजेसी दिधले दु:ख
स्त्रिया वारिल्या अनेक। राज्यभेद करूनिया
वारिल्या स्त्रिया व्यतिरिक्त। बलात्कारे धरिल्या अमित।
ब्राह्मण स्त्रिया तीन शते। शत चारी क्षत्रियाते।
वैश्मिणी वरिल्या षट शत। शूद्रा स्त्रिया सहस जाब।
एक शत स्त्रिया डोंबिणी। रजकिनी वरिल्या शत चारी म्या।

या काव्यातला राजा 'दुर्जन' या टोपण नावाचा असला, तरी तो बहारतो सुलतान होता ते इतिहास संशोधक जाणतात.

कदाचित वाचकांना यात अतिशयोक्तीही वाटण्याचा संभव आहे.

पण ही वस्तुस्थिती आहे.

उदाहरण द्यायचं झालं तर अफझलखानाचं देता येईल.

अफझलखान छत्रपती शिवरायांच्या पारिपत्यार्थ प्रतापगडाकडे निघाला.

त्याआधी आठ दिवस त्याने स्वत:ला कोंडून घेतले- जनानखान्यात. आणि मग आठ दिवसांनंतर त्यांने आपल्या जनानखान्यातील दोनशे स्त्रियांना बाहेर काढले, एका रांगेत उभे केले नि मग त्यांची मस्तकं निर्घृणपणाने धडावेगळी केली.

कारण एकच, आपल्या अनुपस्थितीत त्यांच्यापैकी कुणी अन्य कुणाशी अनैतिक कृत्य करू नये.

आज हिंदू राष्ट्रात यवनशाही सुरू आहे हे यवनांच्या गेल्या पन्नास वर्षांतल्या वाढत्या लोकसंख्येने, त्यांच्या दुर्वर्तनाने, बॉम्बस्फोटासारख्या दहशतवादाने नि अतिरेक्यांच्या वाढत्या अतिरेकी कारवाईने स्पष्टच केले आहे. यवन आपल्यावर घातक शस्त्रांचा मारा करून आमची निष्पाप जनसंख्या कमी करतो आहे आणि षंढ सरकार आजही निषेधाची कागदी भेंडोळी फेकते आहे. जनतेच्या पैशावर परदेशात दौरा करायला मिळतो म्हणून आपली बाजू कशी न्याय्य आहे हे जगाला सांगायला फार्स करत आहे. मात्र या देशातल्या माजलेल्या यवनाला 'वंदे मातरम्' म्हणायलाच हवं असं बजावू शकत नाही. स्पीकरवरून दिल्या जाणाऱ्या बांगेला आवर घालू शकत नाही. पाकिस्तान क्रिकेट संघ विजयी होताच यवनांच्याकडून जी फटाक्यांची आतषबाजी होते, तिला आवर घालू शकत नाही.

उलट या यवन सत्तेचं बळ कसं वाढेल याच प्रयत्नात आहे.

ही यवनशाही नाही; रावणशाही आहे.

आसुरी अभिलाषेने दुर्बलनाकडे झुकलेल्या रावणाचा संहार करण्यासाठी कौसल्येने श्रीरामाला जन्म दिला होता. तेच कार्य साडेतीनशे वर्षांपूर्वी जिजामातेने करून सुराज्य संस्थापक श्री शिवरायांना जन्माला घातले होते.

जिजाबाई- एक स्वाभिमानी कन्या, कर्तृत्ववान पत्नी नि देव-धर्म-देशावर प्राणांहून अधिक प्रेम करणारी माता. बलवंत असूनही यावनी चाकरी करत पातशाहीच्या समोर गर्दन झुकविणाऱ्या पित्याची कीव न करणारी, समर्थांनी ज्या गोदातीरी धर्मरक्षणार्थ तप केले, त्याच गोदातीरी आपल्या पतीच्या प्रलयभावाच्या राजांच्या पत्नीला मशबत खानाने पळवून नेले होते हे कानांवर येताच पेटून उठलेली हिंदू स्त्री. नि तरीही पातशाहीची खुशामत करणाऱ्या कर्तृत्ववान पतीच्या कर्तृत्वाला हीन समजणारी पत्नी.

नि मग संधी पावताच धाडसाने मान वर करून पाहणारी, आपल्या पुत्रात स्वैराचारी यवनांच्या दगलबाजीविरुद्ध भावना ठेचून भरणारी आणि त्याला शस्त्र-अस्त्रविद्या, राजकारण समजावून सांगून बलवंत बनविणारी एक जिद्दी माता.

जे शूर सेनानी लखुजीराव जाधवांना जमलं नाही-

जे पराक्रमी शहाजीराजे भोसल्यांना साधलं नाही-

जे बलवंत खंडागळे साधू शकले नाहीत -

निंबाळकर, मोरे, जेधे, बांदल, देशमुख आदी सारे स्वकीय मोहरे पातशाहीच्या पटावरची केवळ प्यादी बनली; त्याच पातशाहीच्या काळात जाधवांची कन्या, भोसल्यांची सून वजीर बनून मिरविली. उरात स्वैराचारी यवनांच्या दुर्बलनाने पेटलेल्या या स्त्रीने आपल्या सुसंस्काराने एक पातशहा बनविला. सिंहासनारोहण होण्याआधीच 'राजा' म्हणून मान्यता पावला, असा पातशहा-छत्रपती शिवराय. आणि मग या अग्निरेखेने पेटविलेली आग जी सर्वदूर पसरली की, यवनांच्या उन्मत्तपणाचे कोळसे झाले. दुर्वर्तने जळून खाक झाली. देश गिळंकृत करण्यास आलेली ही असुर मंडळी अखेर पळाली... काही पळाली, काहींना त्यांच्या दुर्वर्तनाचं प्रायश्चित्त मिळालं; तर काही देशोधडीला लागले.

हिंदू हिंदू म्हणून जगला तो या अग्निरेखेच्या प्रकाशामुळेच.

आजही या अशाच अग्निरेखेची गरज आहे आपल्या देशाला.

गेल्या पन्नास वर्षांतील राजकीय उन्मत्तता उन्मळून टाकण्यासाठी-

सहकाराच्या नावावर स्वाहाकार करणाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी-

स्वैराचारी आधुनिक अफझलखानांचा पाडाव करण्यासाठी...

मी ऐतिहासिक लेखन करतो; त्यामुळे पुन्हा पुन्हा हा इतिहास लिहिण्याचं कारणच काय, असं विचारणारे नि स्वत:ला बुद्धिवंत समजणारे आहेत समाजात. त्यांना हिटलरची पाच-पन्नास चरित्रं बाजारात आली तरी चालतात. लेनिन, स्टॅलिन, केनेडी, अब्राहम लिंकन इत्यादी चालतात; पण ज्यांनी 'हिंदू' म्हणून ज्यांचं अस्तित्व राखलं, राज्य निर्मिलं, मंदिरांना इजा होऊ दिली नाही, धर्म नि देवांचं रक्षण केलं; त्यांच्यावरचं एखादंही पुस्तक चालत नाही, याला काय म्हणावं? त्यांच्यासारखे कृतघ्न अन्यत्र सापडतील का?

आयुष्यभर मास्तरकी केलेला मी एक सामान्य मनुष्य. आयुष्यातली छत्तीस वर्षे विद्यार्थ्यांच्यात वावरलो मी - त्यांची मनं जाणून घेतली, त्यांच्या भावना ओळखल्या, त्यांनाही काहीतरी बनायचं आहे हेही ओळखलं मी.

पण काय बनायचंय?

सरपंच-

जिल्हा परिषदेचा अध्यक्ष-

साखर कारखान्याचा चेअरमन-

पतपेढीचा व्यवस्थापक ?

आमदार ? खासदार की, मंत्री ?

शिक्षणाच्या अलीकडच्या स्पर्धात्मक दुनियेत सगळ्यांनाच डॉक्टर, इंजिनियर वा वकील होता येत नाही. शिक्षक, कारकून होण्यासाठीही शिक्षणमहर्षींना पन्नास-साठ हजारांची चिरीमिरी द्यावी लागते.

आणि हे बहुजन समाजातील कुणालाही शक्य होत नाही.

म्हणूनच तर मग ही मंडळी पुढारी होण्याचा साधा सोपा मार्ग पत्करतात.

त्यासाठी गुंडगिरी करतात, सत्ता पावताच भ्रष्टाचार सुरू करतात आणि इथूनच मग स्वैराचार, विषयांधता, दुर्वर्तन, मुजोरपणा यांना ऊत येतो. देशहितापेक्षा स्वहितच मोलाचं ठरतं आणि मग घराण्याच्या सात पिढ्यांची तरतूद करण्यासाठी आटापिटा सुरू होतो.

मुलगा डॉक्टर होताच सुखावणाऱ्या माता आज समाजात असंख्य आहेत.

इंजिनियर पुत्राची आई म्हणवून घेण्यात केवढा तरी अभिमान वाटतो मातांना.

वकिलाची सनद घेऊन समोर उभ्या राहिलेल्या पुत्राला पाहताच आईचे डोळे निवतात.

त्यामागचा हेतू हाच की, एक रुपयाच्या पेन्सिलीने दहा रुपयांना टोचून मुलगा लवकरात लवकर बंगला, मोटार, साऱ्या सुविधा प्राप्त करील.

कॉर्पोरेशनच्या निवडणुकीला उभ्या राहिलेल्या एका उमेदवाराची कथा नुकतीच घडलेली–

आईने दागदागिने विकले, जुन्या घरावर कर्ज काढलं; त्या पैशात कार्यकर्त्यांना भोजनावळी घातल्या.

मी सहजच विचारले, ''हा खर्च अनाठायी नाही?''

''मुळीच नाही. कारण हे केल्याशिवाय निवडणूक जिंकताच येत नाही.''

''समजा, दुर्दैवानं अपयश आले तर ?''

''तसं होणे नाही.''

''कशाच्या जोरावर बोलत आहात ?''

''चांगले दोन लाख वाटलेत भागात.''

आणि गंमत अशी की, तोच निवडून आला.

अपक्ष म्हणून !

बहात्तर उमेदवार असलेल्या महानगरपालिका हद्दीत चांगले चौपन्न उमेदवार अपक्ष म्हणून निवडून आले आणि मग सत्तारूढ सरकारच्याच दोन गटांतील मातब्बरांच्यात महानगरपालिकेवर आपलं वर्चस्व राहावं, पुढची विधानसभा वा लोकसभा त्यांच्या बळावर जिंकता यावी म्हणून स्पर्धा सुरू झाली. एकाने प्रत्येकी पाच लाख देण्याची तयारी केली; दुसरा सहावर पोहोचला.

अखेर नवावर तडजोड झाली.

त्यानंतर तो मला भेटला, म्हणाला, ''साडेतीन लाख खर्च केले.''

''बरं मग ?''

''महानगरपालिकेचा नेता होऊन निवडीआधीच नऊ लाखाची प्राप्ती करून बसलो. म्हणजे निव्वळ नफा साडेपाच लाख रुपये. शिवाय पाच वर्षांची कारकीर्द बाकी आहेच. त्यात सहज पाच-पंचवीस लाख कमावता येतील.''

आज त्याचं शहरात थ्री स्टार हॉटेल आहे. चार टोलेजंग इमारती आहेत. तो राहतो तो बंगलाच मुळी चौदा-पंधरा लाखांचा आहे. विदेशी गाडीतून हिंडतो तो आणि लोक त्याला 'दादा' या नावाने संबोधतात.

'दादा' म्हणवून घेत मिरविणाऱ्या आपल्या मुलाकडे पाहताना त्याच्या आईच्या डोळ्यांत भरभरून कौतुक दिसतं.

दुष्ट प्रवृत्त कंसाची हत्या करणाऱ्या भगवान श्रीकृष्णाची माता म्हणवून घेणाऱ्या यशोदेला जे समाधान आहे...

वा स्वैराचारी, धर्मांध, दगलबाज यवनांना दाती तृण धरायला लावून सुराज्य निर्मिती करणाऱ्या शिवबाच्या मातेला– त्या अग्निरेखेला– माता जिजाला जो अभिमान आहे, त्यातला लवलेश तरी आहे का मंत्रिमाता म्हणवून घेणाऱ्या स्त्रीच्या नशिबात ? तो असता तर तिने भ्रष्टाचारातून लाभलेल्या सुखाचा स्वाद चाखण्यापेक्षा मरण पत्करलं असतं.

आज मी या अशा अग्निरेखेचं जीवनचरित्र रंगवायचा प्रयत्न केलेला आहे. केवळ पित्याच्या शिलेदारीमुळे जन्मापासूनच दैवी आलेल्या असहाय भ्रमंतीचे चटके बसलेल्या अग्निरेखेची शिलेदारकी लाभली म्हणून पुन्हा तीच दुःखद भ्रमंती वाट्याला आलेने आणि ही भ्रमंती म्हणजे केवळ विषवृक्षाला खतपाणी घालण्याचा प्रकार आहे, याची जाणीव झालेल्या अग्निरेखेची ही कहाणी आहे.

ही अग्निरेखा डिवचलेली नागीण आहे; रौद्ररूप धारण केलेली आकाशीची चपला आहे. आकाशीची चपला म्हणजे निमिषमात्रच सारं ब्रह्मांड उजळून टाकणारी अग्निरेखाच! ती केवळ निमिषमात्रच चमकते. सारं ब्रह्मांड हादरवून टाकणारा आवाज करते, कोसळतेही कुकर्म्यावर... हे केव्हा घडलं... कसं घडलं याचा मागमूसही न ठेवता जशी येते, तशी निघूनही जाते.

माता जिजा अशीच जन्माला आली. पिता नि पती यांच्या सहवासात दरवेशाचं निराधार जीवन जगली. पित्याची अमानुष हत्या पाहिली तिने; पतीची झालेली अवहेलना उरात जतन करून ठेवली तिने; पती हयात असताना परित्यक्तेचं जीवन वाट्याला येऊनही तिने धीर सोडला नाही. आपण एक स्त्री आहेत; दुबळ्या आहोत हा विचारही स्वत:च्या मनाला स्पर्शू दिला नाही तिने. ती योग्य वेळेची वाट पाहात राहिली. प्रतीक्षा केली तिने नि मग योग्य वेळ येताच...

शिवबाच्या-आपल्या पुत्राच्या हातून तिने एक नवा इतिहास घडविला.

दुर्दैवाने यवनांचा उदो उदो करणारी टिपू सुलतान ही मालिका आपलं शासन दूरदर्शनवर दाखविते. यवनांच्या खोट्या नाट्या संस्कारांचा उदो उदो करण्यासाठी न चुकता अलिफ-लैला प्रदर्शित करते. आता तर हातिमताई येते आहे आणि अकबर दि ग्रेट ने तर दूरदर्शनवर

वर्षांनुवर्षांची आपली हजेरी निश्चित केली आहे. यानंतर न जाणो, औरंगजेबही आलमगीर या नावाने दूरदर्शनवर येईल. पाठोपाठ बाबर, हुमायून, अल्लाउद्दीन खिलजी....

अल्पसंख्यांक मानल्या गेलेल्या नि आज भारतीय लोकसंख्येच्या एक चतुर्थांश हिस्सा बनलेल्या यवनांच्या एकगठ्ठा मतासाठी शासन त्यांना काय देईल, त्यांच्यासाठी काय करेल, काहीच सांगता येणार नाही; कारण त्यांना जनमतापेक्षा सत्ता हवी आहे. याबाबतीत त्यांनी यवननीतीच अनुसरली आहे. औरंगजेबाने ज्याप्रमाणे बंधुहत्या करून, पित्याला कैद करून तख्त हासील केले; त्याप्रमाणेच हे शासन स्वकीयांच्या भावभावनांचे मुडदे पाडून आजवर सत्ता जिंकत आले आहे नि यापुढेही सत्ता जिंकणार आहे.

सरड्याप्रमाणे रंग बदलणारे, स्वार्थासाठी बेडूक-प्रवृत्ती अनुसरून कोणत्याही पक्षात उडी मारण्याची तयारी करून बसलेले हे शासक; ह्यांना धर्म मोलाचा नाही. देवाला तर त्यांनी केव्हाच बाजूला केले आणि त्या जागी स्वत:चीच प्रतिष्ठापना केली आहे. देशाचा विचार तर केवळ पाच वर्षांतून एकदाच शिवतो त्यांच्या मनाला.

पण आज अशांना धडे शिकविणारे पुत्र जन्माला घालणाऱ्या माताही आहेत.

'इन्कलाब जिंदाबाद'चा नारा लगावणाऱ्या भगतसिंगाला जन्माला घालणाऱ्या मातेसारख्या-

'माझ्या धर्माला जो नावे ठेवील, त्याला मी समुद्रात फेकून देईन', असं ठामपणाने बजावणाऱ्या विवेकानंदांना जन्माला घालणाऱ्या मातेसारख्या-

आणि तुटपुंज्या बळावर सारा हिंदुस्थान व्यापून राहिलेल्या विश्वासघातकी यवन सत्तेला शह देऊन हिंदवी स्वराज्य स्थापन करून हिंदू धर्माचं रक्षण करणाऱ्या शिवबाच्या मातेसारख्या-त्या अग्निरेखेसारख्या-

इतिहास जिवंत राहायलाच हवा; अन्यथा साऱ्या जगात मानाचं स्थान अबाधित राखून बसलेली ही हिंदू संस्कृती पार लयाला जाईल, नव्या पिढीपुढे आदर्श असा ठरणारच नाही; आणि मग हा देश स्वार्थांधांचा देश, सत्तांधांचा देश, दगलबाजांचा देश म्हणूनच ओळखला जाईल.

दुर्दैवाने आज या जीवनचरित्रांकडे चित्रपट-दिग्दर्शक दुर्लक्ष करून राहिले आहेत. 'पैसा' च गोळा करण्याचा हेतू नजरेसमोर ठेवून सावळा गोंधळ चित्रित करीत आहेत. खून, मारामाऱ्या, लबाडी, फसवणूक, रोमान्स यांनी भरलेल्या दिशाहीन मालिका दूरदर्शनवर दाखविल्या जात आहेत. त्यातून संस्कारहीन जीवनाचं प्रदर्शन मांडलं जात आहे.

याची कुणाला तरी लाज वाटेल का ? शासन नसेना का, पण कुणी इतिहासप्रेमी यासाठी पुढे येऊ शकेल का ?

याचं उत्तर 'होय' असं मिळणं याची शक्यता निदान या क्षणी तरी दिसत नाही. इतरांचं काही का असेना, मी मात्र सातत्याने इतिहास जिवंत ठेवण्याचं काम करतो आहे आणि यापुढंही करीत राहणार आहे. कुणाच्याही निंदानालस्तीची पर्वा न करता.

'अग्निरेखा' साकार करीत असताना मी शक्य तेवढा इतिहासाशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला आहे. अग्निरेखा ही एक माता आहे. एका युगपुरुषाची पण केवळ माताच नाही, कुणाची तरी कन्या आहे, कुणाची तरी पत्नी आहे... सर्वसामान्य स्त्रीला ज्या ज्या नातेसंबंधांत बांधून घ्यावं लागतं, ती सारी बंधनं तिलाही आहेत आणि ही सारी नाती, बंधनं असतील तशी माणसाला पत्करावी लागतात. तिनेही ती पत्करली आहेत. पिता आणि बंधूंच्या दगलबाजीने केल्या गेलेल्या हत्येनं ती व्यथित झाली आहे. दिराच्या वधाने शोकाकुल बनली आहे. पतीच्या अपमानानं चिडली आहे. ज्येष्ठ चिरंजीव संभाजीच्या हत्येने विव्हल बनली आहे आणि पतीच्या अपघाती निधनानं व्यथितही झाली आहे. पण हे सारं करीत असताना तिनं आपलं कर्तव्य सोडलेलं नाही; जिद्द सोडलेली नाही.

जिजाऊसाहेबांनी जन्माला घालतानाच शिवबाला आपलं सुंदर रूप दिलं.

तद्वतच त्यांचं चारित्र्यही घडविलं.

जन्मत:च लोकमान्यता पावलेल्या या राजाला लोकहितदक्ष, धर्मप्रेमी राजा बनविण्याचं अवघड काम तिला करावं लागणार होतं.

आणि तिने ते केलं- परिणामांची पर्वा न करता.

'अग्निरेखा' च्या निमित्ताने मी हेच शब्दांकित केलं आहे.

हे करीत असताना क्वचित प्रसंगी मला कल्पनेचं साहाय्य घ्यावं लागलं आहे, नाही असं नाही; पण ती या चरित्राला त्याची गरज होती, म्हणूनच.

आजवर माझ्या रसिक वाचकांनी माझ्या प्रत्येक कादंबरीवर प्रेम केलंय.

त्यांच्या पत्रांच्या ओघातून मला ते जाणवलंय.

आणि म्हणूनच साऱ्या समस्या दूर ठेवून मी हा लेखनभार सांभाळला.

नि आज त्यातून मुक्त झालो आहे.

या कादंबरीचं यश हे सर्वस्वी अग्निरेखा जिजामातेचं यश आहे; मात्र त्रुटी माझ्या स्वत:च्या आहेत, हे मी इथं प्रांजळपणाने कबूल करीत आहे.

✦✦